ePaper

# चंद्रकांत पाटलांची सुप्रिया सुळेंवर वैयक्तिक टीका, सदानंद सुळे संतापले!



| वर्ष - 6 | अंक - 51 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- बिनव्याजी विशेष साहाय्य योजनेतून ३०० कोटी रुपयांची मागणी
- इंधन कर कपातीसाठी महाविकास आघाडी सरकारविरोधात 'यल्गार'!
- गुड न्यूज : पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाची मदत!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 26 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"आम्ही कुणाच्याही पाठीत खंजीर खुपसला नाही. आमच्या वाटणीची जागा आम्ही छत्रपतींना द्यायला तयार झालो. याला पाठीत खंजीर खुपसणे म्हणतात का? कुणी काहीही बोलत असेल तर जरा जपून बोला", तर महाविकास आघाडीवर असे चुकीचे आरोप करणं हा छत्रपतींच्या विचारांचा अपमान आहे. 'खंजीराची भाषा करु नका, बोलताना जरा सांभाळून बोला'

**- संजय राऊत,** खासदार

"आमचं सरकार दडपशाहीचं नाहीये, विरोधकांना तेही भाजपच्या प्रदेशाध्यक्षांना असं वाटत असेल की त्यांनी माझ्या विधानावर बोलावं, तर तो त्यांचा अधिकार आहे, त्यात गैर काय, मी इतका काही त्याचा विचार करत नाही, त्यांना वाटलं म्हणून ते बोलले असेल", ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सध्या राज्यातील तापमान चांगलंच तापलं आहे.

**सुप्रिया, सुळे,** खासदार




**कोरोनाबाबत पिंपरी-चिंचवडकरांमध्ये**

# गांभीर्य अन् भीतीही ओसरली!

## सुमारे दीड लाख पिंपरी-चिंचवडकरांनी दुसऱ्या डोसकडे फिरवली पाठ

## प्रशासनापुढे आव्हान : महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी फोन करुनही नागरिकांमध्ये उदासिनता...




## एकूण : 35 लाख 87 हजार 659

| पिंपरी-चिंचवड |

महाईन्यूज|

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत लस घेण्यासाठी धडपणारे, रांगेत थांबणारे, ऑनलाइन बुकिंगसाठी निश्चित वेळेत वारंवार प्रयत्न करणारे नागरिक आता मात्र दुसरा डोस घेण्यासाठी टाळाटाळ करत आहेत. तिसरी लाट वेगाने ओसरल्यानंतर आणि दुसऱ्या लाटेइतकी भीषण परिस्थिती न झाल्याने कोरोना संपल्याच्या भ्रमात शहरातील सुमारे दीड लाख नागरिकांनी दुसऱ्या डोसकडे पाठ फिरवली आहे. नागरिकांना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी फोन करुनही नागरिक दुसरा डोस घ्यायला जात नसल्याचे दिसून येत आहे.

शहरात १६ जानेवारी २०२१ रोजी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण सुरु झाले.सुरुवातीला आरोग्य कर्मचारी



आणि प्रंâटलाइन वर्वâर्स यांना लस देण्यात आली.त्यानंतर ज्येष्ठ नागरिक आणि इतर आजार असलेल्या नागरिकांना लस देण्यात आली. त्यानंतर १८ वर्षाखालील नागरिकांना लस देणे सुरु झाले. त्यानंतर लसीकरणाने वेग घेतला. सुरुवातीला ऑनलाइन नोंदणी करावी लागत होती. त्यामुळे नागरिकांना अडचणी आल्या. परंतु त्यानंतर ऑन दी स्पॉट लसीकरण सुरु झाल्यामुळे नागरिकांची सोय झाली आणि लसीकरणाला प्रतिसाद वाढला. सद्यस्थितीत शहरातील सुमारे दीड लाख नागरिकांचा दुसरा डोस बाकी आहे.यातील काही जणांनी शहराच्या बाहेर डोस घेतला असण्याची शक्यता आहे.ज्यांच्या डोस बाकी आहे.अशा नागरिकांचा शोध घेतला जात आहे.

तसेच त्यांनी लसीकरण करुन घ्यावे, असे आवाहन वैद्यकीय विभागाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे यांनी केले आहे.




पिंपरी-चिंचवड शहरात ३ लाख ५९ हजार ६३० नागरिकांना कोरोना झाला. तर, शहरात एका वर्षात ३५ लाख ८७ हजार ६५९ कोरोना प्रतिबंध लसीचे डोस देण्यात आले आहेत. सध्या कोरोनाची रुग्णसंख्या घटली आहे. १५ मे रोजीच्या आकडेवारीनुसार शहरात फक्त ८३ सक्रिय रुग्ण असून ८३ रुग्ण गृहविलगीकरणात उपचार घेत आहेत. तर, महापालिका रुग्णालयात कोणताही रुग्ण उपचारार्थ दाखल नाही.

## शॉर्ट न्यूज »

### कारागृह अधिक्षकाच्या मुलाचा पुण्यात खून

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

पुणे : गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुन्ह्यांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. असे असतानाच आता अमरावतीच्या तरुणाची पुण्यात हत्या झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. गिरीधर गायकवाड असे या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी पाच अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गिरीधर हा अमरावती कारागृहाचे अधिक्षक उत्तरेश्वर गायकवाड यांचा मुलगा आहे. या प्रकरणी मृत गिरीधरचा भाऊ निखिल कुमार गायकवाड यांच्या फिर्याद दिली आहे. मंगळवारी रात्री गिरीधरच्या मोबाईलवर एक फोन आला. फोन ठेवल्यानंतर तो घाईघाईने घरातून बाहेर पडला, गिरीधर घरातून बाहेर पडताना निखिल यांनी कोणाचा फोन आहे, कुठे चाललास असल्याचे विचारले. त्यावर त्यांनी फक्त जाऊन येतो म्हणून उत्तर देत तो निघून गेला. गिरीधर बराच वेळ होऊनही घरी न आल्याने निखिलने पुन्हा फोन लावला. तेव्हा एकदा रिंग वाजली आणि नंतर फोन नॉट रिचेबल लागला.

## बिनव्याजी विशेष साहाय्य योजनेतून 300 कोटी रुपयांची मागणी

# विकास आराखड्यातील कामांसाठी सुमारे 300 कोटी रुपयांचा निधी हवा!

### 'पीएमआरडीए'ची राज्य सरकारकडे मागणी

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

पुणे विद्यापीठ चौकात दुमजली उड्डाणपूल, पंतप्रधान आवास योजना, विकास आराखड्यातील रस्ते अशा विविध प्रकल्पांसाठी सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी हवा आहे. केंद्र सरकारकडून भांडवली विकास कामांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या बिनव्याजी 'विशेष साहाय्य योजने'तून तो उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी 'पीएमआरडीए'ने राज्य सरकारकडे केली आहे.

उड्डाणपुलासंदर्भात पुणे महापालिका, पीएमआरडीए आणि राज्य सरकार यांच्या मध्यंतरी एकत्रित झालेल्या बैठकीत उड्डाणपुलासाठी येणाऱ्या एकूण खर्चाच्या पन्नास टक्के खर्च महापालिकेने उचलावा असे ठरले होते. विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल उभारण्यासाठी सुमारे २७० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. १३५ कोटी रु. महापालिकेने द्यावेत, याशिवाय दोन भुयारी मार्ग, एक ग्रेड सपरेटर बांधण्यासाठी ३०० कोटी रुपये खर्च



अपेक्षित आहे. हे दोन्ही खर्च विचारात घेऊन ४३५ कोटी रु. महापालिकेने द्यावेत, अशी विनंती पीएमआरडीएने महापालिकेला प्रस्ताव पाठवून केली आहे. पालिकेने त्यास नकार दिला होता. मध्यंतरी राज्य सरकारकडे झालेल्या बैठकीत हा खर्च महापालिकेनेच द्यावा, असा निर्णय घेण्यात आला होता. महापालिकेने त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे, प्रारूप विकास आराखड्यातील रस्ते अशा विविध प्रकल्पांचे नियोजन पीएमआरडीएने हाती घेतले आहेत. अशा सर्व प्रकल्पांसाठी पीएमआरडीएला निधीची आवश्यकता आहे.

### अपेक्षित खर्च

- हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यान 'पीएमआरडीए'कडून मेट्रो प्रकल्पाचे काम हाती
- संपूर्ण प्रकल्प इलेव्हेटेड
- पुणे विद्यापीठ चौकातील अडथळा ठरणारा उड्डाणपूल पाडला
- सेनापती बापट रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी त्या जागी दुमजली उड्डाणपूल उभारण्याचे नियोजन
- कामासाठी सुमारे ५७० कोटी रुपये खर्च अपेक्षित

### काय आहे निर्णय?

- केंद्र सरकारकडून भांडवली कामांसाठी 'विशेष साहाय्य योजनेंतर्गत' राज्यांना पाच हजार ५४ कोटी रुपये बिनव्याजी पन्नास वर्षांच्या दीर्घ मुदतीने उपलब्ध करून देण्याचा निर्णय
- राज्य सरकारकडून महापालिका आणि पीएमआरडीएला पत्र पाठवून योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आव्हान
- 'पीएमआरडीए'कडून पुणे विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपुलासह विविध प्रकल्पांसाठी ३०० कोटी रु. निधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव
- राज्य सरकारची मान्यता घेऊन तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार
- त्यास मान्यता मिळाली, तर उड्डाणपूल उभारणीसाठी निधीचा प्रश्न मार्गी लागणार
- पुणे महापालिकेवरील आर्थिक भार देखील कमी होण्यास मदत

### काय कामे होणार?

- पुणे विद्यापीठ ते ई स्क्वेअरपर्यंत असा सव्वा किलोमीटर लांबीचा दुमजली उड्डाणपूल
- दुसऱ्या स्तरावर मेट्रोसाठी स्वतंत्र मार्गिका असणार
- बाणेरकडे जाण्यासाठी दुपदरी रॅम्प
- सेनापती बापट रस्त्यावर उड्डाणपुलावर जाण्यासाठीचा रॅम्प
- पाषाणकडे जाण्यासाठी दुपदरी रॅम्प
- बाणेरकडून शिवाजीनगरकडे, तसेच शिवाजीनगरकडून बाणेरला जाण्यासाठी दुपदरी भुयारी मार्ग
- शासकीय तंत्रनिकेतनच्या आवाराच्या समोरील बाजूस शिवाजीनगर ते औंध उड्डाणपुलावर जाण्यासाठी रॅम्प
- हरेकृष्ण मंदिर पथावर भुयारी मार्ग
- सिमला ऑफिस चौकात ग्रेड सेपरेटर व उड्डाणपूल

## अल्पवयीन मूलीवर लैंगिक अत्याचार; एकाला मरेपर्यंत जन्मठेप; पुणे सत्र न्यायालयाचा निकाल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी दोषी आढळल्याने किरकटवाडी (ता. हवेली) येथील छबी मोहन सोनी (वय 25, मुळ रा. उत्तर प्रदेश) यास पुणे सत्र न्यायालयाने मरेपर्यंत जन्मठेप व पंचवीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश के.के. जहागीरदार यांनी हा निकाल दिला आहे.

ओळखीचा फायदा घेत सोनी याने चौदा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केले. मुलीची प्रकृती खालावल्याने तीला खाजगी रुग्णालयात दाखल केले असता हा प्रकार उघडकीस आला. 2019 साली



मुलीच्या आईच्या तक्रारीनुसार हवेली पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपी सोनी याला हवेली पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक अशोक शेळके यांच्या पथकाने पुणे रेल्वे स्थानकावरुन ताब्यात घेतले होते.

पोलीस निरीक्षक शेळके यांनी सदर प्रकरणाचा गांभीर्याने तपास करत पुरावे गोळा केले. त्याआधारे आरोपी सोनी यास न्यायालयाने दोषी ठरवले व सदर शिक्षा सुनावली आहे.

## पुण्यात भाजपच्या १५ कार्यकर्त्यांची राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यास मारहाण

### राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भाजप तणाव पुन्हा वाढण्याची चिन्हे

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (NCP) पदाधिकाऱ्यास भाजपच्या (BJP) माथाडी सेलच्या माजी अध्यक्षासह 15 ते 20 जणांनी मारहाण केली. त्याचबरोबर पदाधिकाऱ्याच्या कार्यालयाची मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. हि घटना बुधवारी सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास नारायण पेठेत घडली. दरम्यान, या प्रकरणी विश्रामबाग पोलिस (Police) ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या प्रकारामुळे राष्ट्रवादी विरुद्ध भाजप यांच्यातील तणाव आणखीनच पुन्हा एकदा




वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

आप्पा जाधव असे मारहाण झालेल्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे. जाधव हे राष्ट्रवादीचे पक्षाचे सरचिटणी म्हणून कार्यरत आहेत. जाधव यांचे भिडे पुलाकडून नारायण पेठेत येणाऱ्या चौकात हॉटेल मुरलीधरजवळ जनसंपर्क कार्यालय आहे. जाधव हे त्यांच्या कार्यकर्त्यांसमवेत बुधवारी सायंकाळी त्यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये बसले होते. त्यावेळी भाजपच्या माथाडी सेलचा माजी अध्यक्ष संतोष कांबळे हा त्याच्या 15 ते 20 साथीदारांसह जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर आला. त्याने जाधव यांना त्यांच्या कार्यालयातच मारहाण केली.

या मारहाणीमध्ये जाधव यांना जबर दुखापत झाली. त्यानंतरही कांबळे व त्याच्या साथीदारांनी जाधव यांच्या कार्यालयाची तोडफोड करीत दंगा केला. या घटनेनंतर कांबळे व त्यांचे साथीदार दुचाकीवरुन पसार झाले. दरम्यान, त्यातील एक जणाची दुचाकी व चावी जाधव यांच्या कार्यालयासमोरच पडली.

- पक्षाचे सरचिटणीस जाधव यांना मारहाण होऊन त्यांच्या कार्यालयाची तोडफोड झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, प्रवक्ते प्रदीप देशमुख यांच्यासह प्रमुख कार्यकर्त्यांना समजली. त्यानंतर शहराध्यक्षांसह कार्यकर्त्यांनी तेथे धाव घेतली. या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन शहराध्यक्ष जगताप, देशमुख यांनी विश्रामबाग पोलिस ठाणे गाठले. त्यानंतर कांबळे व त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### चारित्र्यावर संशयावरून विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा दाखल

।पिंपरी-चिंचवड।
महाईन्यूज । प्रतिनिधी ।

विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तसेच माहेरहून संसारोपयोगी वस्तू आणि पैसे आणण्याची मागणी करत छळ केला. हा प्रकार 8 मे 2002 ते 24 मे 2022 या कालावधीत जगताप डेअरी वाकड येथे घडला. पती अविनाश गंगाधर अभंग (वय 46), सासरे गंगाधर अभंग (वय 70), सासू लाटा अभंग (वय 65), दीर प्रशांत अभंग, दीर रवींद्र अभंग (सर्व रा. जगताप डेअरी, वाकड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पीडित विवाहितेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांच्या चारित्र्यावर संशय घेतला. फिर्यादीकडे माहेरहून पैसे आणण्याची तसेच संसारोपयोगी वस्तू देण्याची मागणी केली. वस्तू देण्यासाठी नकार दिल्यानंतर वारंवार शिवीगाळ व मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत शारीरिक व मानसिक छळ केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### भाजपा युवा मोर्चाचे राज्यव्यापी आंदोलन

# इंधन कर कपातीसाठी महाविकास आघाडी सरकारविरोधात 'यल्गार'!

### शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील महाविकास आघाडी सरकार दारुवरील करामध्ये ५० टक्के कपात करते, मग पेट्रोल- डिझेलसह इंधनावरील करांमध्ये कपात का करीत नाही? असा सवाल उपस्थित करीत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन केले. पिंपरी-चिंचवडमधील भाजयुमोच्या वतीने बुधवारी निगडी येथील तहसील कार्यालयात निदर्शने करण्यात आली. यावेळी तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे, प्रदेश उपाध्यक्ष अनुप मोरे, शहर उपाध्यक्ष शिवराज लांडगे, सरचिटणीस दिनेश यादव, दीपक नागरगोजे, गणेश जवळकर, राजेंद्र ढवान, जिल्हा उपाध्यक्ष सतीश नागरगोजे, अतुल बोराटे, संदीप नखाते, प्रसाद कस्पटे, जयदीप करपे, राहुल खाडे मंडलाध्यक्ष उदय गायकवाड, सनी बारणे, शिरीष जेधे, दीपक घन, सुमित घाटे, देविदास तांबे, विद्यार्थी संयोजक दिगंबर गुजर, अनिकेत शेलार, अजय मोरे, सदस्य काशिनाथ तिवारी, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस रवी जांभुळकर, प्रकाश चौधरी, संयोजक विक्रांत गंगावणे, सदस्य अभिमन्यू सिंग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

संकेत चोंधे म्हणाले की, नागरिकांची पिळवणूक करणाऱ्या विश्वासघातकी आघाडी सरकारचा आम्ही धिक्कार करतो. फसव्या,विश्वासघातकी राज्य सरकारने पेट्रोल डिझेल वरती एकही रुपया टॅक्स कमी न करता केंद्र सरकारनेच दिलेली सूट आणि त्यामुळे स्वाभाविक पणे राज्याचा कमी होणारा टॅक्स ही आमचीच सूट आहे असा दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे. याद्वारे राज्यातील १२ कोटी जनतेची फसवणूक करीत आहे. राज्य सरकारचा निषेध करीत पेट्रोल डिझेल किंमती वरती किमान ५० टक्के कपात करावी, अशी आमची मागणी आहे.

### महाविकास आघाडीकडून जनतेची फसवणूक...

प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील म्हणाले की, पेट्रोल- डिझेलवरील करांमध्ये केंद्र सरकारने सुमारे ७ रुपयांची सूट दिली. एलपीजी गॅसच्या करांमध्ये १२ सिलिंडरपर्यंत सूट देण्यात आली आहे. केंद्र सरकारने तिजोरीवर दोन लाख कोटी रुपयांचा बोजा करुन लोकांना दिलासा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेवू शकते. मग, राज्य सरकार असा निर्णय का घेत नाही? आघाडी सरकारने राज्यातील नागरिकांची फसवणूक केली. विश्वासघात करण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले. वीज बील माफी झाली नाही. विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. पेपर फोडले जातात. भ्रष्टाचार होतो. सरकारमधील मंत्र्यांना बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये राजीनामा द्यावा लागतो. आता केंद्र सरकारने इंधनावरील करामध्ये सूट दिली, ती आपणच दिली असे भासवून राज्यातील जनतेची चेष्टा केली. इंधन करांमधील कपातीबाबत कसलेली नोटीफिकेशन सरकारकडे नाही. याच जाब आम्ही राज्य सरकारला विचारत आहोत.

## पाडापाडी सुरूच : अतिक्रमण कारवाईची आता थेरगावात धडक

### पोलीस फौजफाट्यासह ६ आरसीसी, ५ पत्राशेड जमीनदोस्त

पिंपरी । महाईन्यूज




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम विरोधी पथकाची अनधिकृत बांधकामावरील धडक कारवाई सुरुच आहे. थेरगाव येथील अनधिकृत बांधकामांवर आज (बुधवारी 25 मे) कारवाई करण्यात आली. महापालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई सुरु केली आहे. अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, टपऱ्या काढण्यात येत आहेत. शहराच्या वेगवेगळ्या भागात दररोज कारवाई सुरु आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यांतर्गत थेरगाव दगडूपाटील येथील अनधिकृत बांधकामावर कारवाई केली. 6 आरसीसी, 5 पत्राशेड पाडण्यात आले. या कारवाईत अंदाजे 17086 चौरस फूट बांधकामाच्या क्षेत्रफळावर कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, सहशहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात होता.

### पवनानगर रोडवर पीएमआरडीएची अतिक्रमण कारवाई

कामशेत पवनानगर रोडवरील नैसर्गिक ओढ्यावर केलेल्या अतिक्रमणावर पीएमआरडीएने कारवाई केली. स्थानिक रहिवासी गणेश लालगुडे यांनी याप्रकरणी संबंधित विभागाशी वारंवार पाठपुरावा केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. कामशेत येथे पवनानगर रोडवरील नैसर्गिक ओढ्यावर अतिक्रमण झाले होते. हे अतिक्रमण झाल्यावर गणेश लालगुडे यांनी तहसीलदार, पीएमआरडीए व संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केला. पत्रव्यवहार करून सुद्धा अतिक्रमण वाढत राहिले. यामुळे गणेश लालगुडे व ग्रामस्थ यांनी यासंदर्भात उपोषण केले होते. त्यावर तहसीलदार यांनी लेखी निवेदन दिले होते. या निवेदनामुळे उपोषण मागे घेण्यात आले होते.

## 'पीएमपीएमएल'च्या 'त्या' कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घ्या : संदीप वाघेरे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



पूर्व PCMT च्या 117 कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी पिंपरी-चिंचवड महापालिका सेवेत सामावून घ्यावे. इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व सुविधांचा लाभ त्यांना देण्याच्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करावी अशी मागणी माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त राजेश पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यात वाघेरे यांनी म्हटले आहे की, पूर्व PCMT चे एकूण 235 कर्मचारी सन 1999 मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे तत्कालीन आयुक्तांचे मान्यतेने वर्ग करण्यात आले होते. PMPML मधील एकूण 235 कर्मचाऱ्यांपैकी 118 कर्मचारी सेवानिवृत्त तसेच स्वेच्छानिवृत्त झाले आहेत.

उर्वरित एकूण 117 कर्मचारी सद्यस्थितीत महापालिकेच्या सेवेत कामकाज करीत आहेत. या सर्व कर्मचारी यांची महापालिकेकडे जवळपास 20 वर्षे सेवा झालेली आहे. त्यासर्व कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या सेवेत सामावून घ्यावे, तसेच इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व सुविधांचा लाभ देणेबाबतचा आदेश राज्यशासनाच्या उपसचिव प्रियंका कुलकर्णी-छापवाले यांनी मार्चमध्ये आपणास दिलेले आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### वीज तोडण्याच्या बनावट 'एसएमएस'द्वारे फसवणुकीचे प्रकार



।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी ।

'गेल्या महिन्याचे वीजबिल भरले नसल्याने आपला वीजपुरवठा रात्री साडेनऊला तोडण्यात येणार आहे. त्यामुळे सोबत दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा..' अशा स्वरूपाचे बनावट 'एसएमएस' वैयक्तिक मोबाइल क्रमांकावरून पाठवून, तसेच एखादी लिंक किंवा प्रणाली उघडण्यास सांगून वीज ग्राहकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार शहरात घडत आहेत. महावितरण कंपनीकडून अशा प्रकारे वैयक्तिक क्रमांकावरून कोणालाही 'एसएमएस' पाठविले जात नाहीत. त्यामुळे ग्राहकांनी या 'एसएमएस'ला प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. पुण्यातील एका ग्राहकाला २३ मे रोजी असाच बनावट 'एसएमएस' पाठवून ऑनलाइनद्वारे २२ हजार रुपये लुबाडल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी संबंधित ग्राहकाने शिवाजीनगर येथील सायबर सेल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.


### लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला आणि कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असलेल्या महिलांना मदतीचा आर्थिक हात

# गुड न्यूज : पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाची मदत!

### महापालिका आयुक्तांचा निर्णय : एकरकमी 50 हजार रुपये देणार







। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पीडित आणि अत्याचारीत मुली किंवा महिलांसह लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला आणि कौटुंबिक हिंसाचाराने पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी महापालिकेच्या वतीने एकरकमी 50 हजार रुपये आधारभूत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी दिली.

महापालिकेने लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला आणि कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असलेल्या महिलांना मदतीचा आर्थिक हात देऊन पिडीत महिलांच्या पुनर्वसनासाठी "निर्भया अस्तित्व पुनर्वसन योजना" (पिडीत व अत्याचारीत मुलीला/महिलेला तिच्या पुनर्वसनासाठी अर्थसहाय्य) ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेद्वारे अशा महिलांना एक वर्षासाठी दरमहा एक हजार रुपये रक्कम देण्यात येत होती आता महापालिका एकदाच 50 हजार रुपये अर्थसहाय्य करणार आहे.

योजनेत सुधारणा करण्यात आली असून काही घटकांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. या सुधारित योजनेनुसार पिडीत आणि अत्याचारीत मुली किंवा महिला तसेच लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला आणि कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत महिलांनाही पुनर्वसनासाठी आधारभूत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. तसेच अशी प्रकरणे पोलिसांमार्फत दाखल करून घेऊन संबंधित मुलीला किंवा महिलेला अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. सुधारित योजनेत समाविष्ट घटकांना ही रक्कम एकदाच देण्यात येईल.

### अटी-शर्ती अशा आहेत...

योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेल्या काही अटी आणि शर्ती शिथिल करण्यात आल्या आहेत. पूर्वी या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये पिडीत महिलेचे मनपा हद्दीतील आधारकार्ड, मतदार ओळखपत्र किंवा मतदार यादीची प्रत, पिडीत असल्याचा पोलीस निरीक्षकाचा अहवाल, एफ आयआरची झेरॉक्स प्रत, समुपदेशन केंद्राच्या अहवालाची प्रत असणे अनिवार्य होते. आता पिडीत आणि अत्याचारीत मुलीने किंवा महिलेने फक्त पोलिसांच्या रिपोर्टसह महापालिका हद्दीतील आधारकार्डची प्रत आणि बँक पासबुकची झेरॉक्स प्रत अर्जासोबत देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# अजित गव्हाणे यांचे थेट देवेंद्र फडणवीसांना आव्हान!

### जलआक्रोश आंदोलनावर टीका : भाजपाच्या भ्रष्टाचारामुळेच शहरात पाणी टंचाई

पिंपरी । महाईन्यूज





पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणात पाणीसाठा असतानाही गेल्या तीन वर्षांपासून भाजप सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रीय आणि भ्रष्ट कारभारामुळे पिंपरी-चिंचवडकरांवर पाण्यासाठी आक्रोश करण्याची वेळ आली आहे. केवळ राजकीय पोळी भाजण्यासाठी आंदोलन करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडमधील पाणीटंचाईची जबाबदारी स्वीकारुन शहरवासियांची माफी मागावी, असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले आहे.

भारतीय जनता पक्षाने औरंगाबाद येथे काढलेल्या जलआक्रोश मोर्चावर गव्हाणे यांनी जोरदार टीका केली आहे. याबाबत त्यांनी एक पत्रक प्रसिद्धीस दिले असून त्यात म्हटले आहे की, भारतीय जनता पक्षाने औरंगाबाद येथे केलेले आंदोलन हे हास्यास्पद ठरले आहे. ज्या ठिकाणी भाजपाची सत्ता आहे त्यातील अनेक ठिकाणी पाण्यासाठी नागरिकांचा आक्रोश सुरू आहे. पिंपरी-चिंचवड शहरातही अशीच स्थिती आहे. आमची महापालिकेत सत्ता असताना शहरात कधीही पाणीटंचाई निर्माण झाली नाही. योग्य नियोजन आणि चांगल्या

महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर अवघ्या दीडच वर्षांत शहरावर पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले. पवना धरण भरलेले असतानाही केवळ निविदा काढणे, भ्रष्टाचार करणे, त्यातून स्वतःची घरे भरणे यामध्ये गुंतलेल्या भाजपच्या पदाधिकारी व नेत्यांनी शहराच्या पाणीपुरवठ्याचा अक्षरशः तीन तेरा वाजविले. नियोजनाच्या अभावामुळे एकदिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. गेल्या 3 वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकारामुळे शहरातील जनतेवर जलआक्रोश करण्याची वेळ आली. भाजपाला शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करता आलेला नाही. हे अपयश भाजपच्या नेत्यांचे नव्हे काय? असाही प्रश्न गव्हाणे यांनी उपस्थित केला आहे.

# महापालिका भवनासाठी ३१२ कोटींचे टेंडर !

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमधील सात एकर जागेवर महापालिका भवनाची नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यात येणार आहे.त्यासाठी ३१२ कोटी २० लाख ३२ हजार ८३८ कोटी रुपये खर्चाची निविदा प्रसिद्ध झाली आहे. पुर्वी काढलेली २४६ कोटी रुपयांची निविदा रद्द झाली असून, नवीन निविदा ६६ कोटी रुपयांनी फुगली आहे. शहर अभियंता राजन पाटील यांनी ही निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना वाढीव खर्चाचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

जुन्या पुणे - मुंबई मार्गावर पिंपरीत महापालिकेची प्रशासकीय इमारत आहे. या चार मजली इमारतीचे तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैल सिंग यांच्या हस्ते १३ मार्च १९८७ रोजी उद्घाटन झाले होते. त्यानंतर सातत्याने महापालिकेचे विस्तारीकरण करण्यात आले. तीन मजल्यावर अधिकाऱ्यांची दालने तर, एका मजल्यावर राजकीय पदाधिकाऱ्यांची दालने आहेत. सध्या विविध कार्यालये आणि दालनांसाठी जागा अपुरी पडत आहे.

## संपादकीय »

# निवडणुकीचा धुरळा...

***मध्य प्रदेश सरकारला याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याची मुभा दिली असल्याने, राज्यातील भाजपच्या आरोपांना तीव्र धार असणार आहे.***

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य निवडणूक आयोगाने मुंबईसह १४ महापालिकांच्या प्रभाग आरक्षण सोडतीचा मुहूर्त ३१ मे रोजी जाहीर केला आहे. महापालिकांमधील कुठले प्रभाग महिला, अनुसूचित जाती, जमातींसाठी राखीव होणार, हे या सोडतीत नक्की होत असते. महापालिकांच्या निवडणुकांकरिता सगळ्यांच राजकीय पक्षांची खऱ्या अर्थाने मोर्चेबांधणी यानंतर सुरू होते; कारण काही प्रभागांमध्ये नव्या उमेदवारांचा शोध आरक्षणावर आधारित घ्यावा लागतो. ते काम आता सुरू होईल; मात्र इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणाविनाच आता १४ महापालिकांच्या निवडणुका होतील असे दिसते. अर्थात, यावरूनही राजकीय आरोप-प्रत्यारोपांची राळ उडेल, यात वाद नाही. ओबीसींची सांख्यिकी देण्यात राज्य सरकारने वेळ काढल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून होतोच आहे. मध्य प्रदेश सरकारला याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याची मुभा दिली असल्याने, राज्यातील भाजपच्या आरोपांना तीव्र धार असणार आहे.

मध्य प्रदेशच्या मागावर्गीय आयोगाने पाच मे रोजी त्यांच्या राज्यातील ओबीसींबाबतचा पहिला अहवाल राज्याला व राज्याने सर्वोच्च न्यायालयाला दिला. हा अहवाल देतानाच, आयोगाने तो परिपूर्ण नसून त्यात अधिक संशोधन व चौकशीची गरज असल्याचे म्हटले होते. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारलाही त्रिस्तरीय चाचण्या बाकी असल्याने, ओबीसी आरक्षणाविना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश १० मे रोजी दिले; मात्र १२ मे रोजी मध्य प्रदेश मागासवर्गीय आयोगाने तत्काळ दुसरा अहवाल दिला व १४ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने या अहवालातील माहितीच्या विश्लेषणात न जाताच, मध्य प्रदेशाला ओबीसी आरक्षणासह निवडणुका घेण्याची मुभा दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या याच निकालाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही मुभा मिळेल, असे अनेक राजकीय पक्षांना वाटत होते. तसे काही होण्यापूर्वीच, राज्य निवडणूक आयोगाने ओबीसीविना आरक्षण सोडत जाहीर केली



## आनंदी सकाळ


# त्रैलोक्याचे जीवन। ज्ञानोबा माझा।।

अंगी परिसीमेची नम्रता धारण करून तुकोबाराय स्वत:विषयी दृष्टान्ताने सांगतात, 'मज पामरासी काय थोरपण। पायींची वहाण पायी बरी।। ब्रह्मादिक जेथे माऊलींना भेटायला येतात, तिथे माऊलींच्या तुलनेला काय पुरे पडणार?' ज्या तुकोबांचा महिमा गाताना रामेश्वर भट्ट म्हणतात, 'तुकिता तुलनेसी ब्रह्म तुक्यासी आले।' एका परब्रह्माशिवाय तुकोबांच्या तुलनेत कोणी असूच शकत नाही. असे तुकोबाराय माऊलींसमोर मात्र स्वत:ला पायीची वहाण म्हणतात. माऊलींची खूण सांगताना तुकोबाराय म्हणतात, 'ज्याच्या दारात सोन्याचा पिंपळ आहे आणि रेड्यामुखी वेद वदविण्याचे सामर्थ्यही असे, असे गुरुमहाराज काय करू शकत नाहीत?' माऊलींची एक कसोटी आहे, ती म्हणजे अंगी बीज शुद्ध पाहिजे. माऊलींचा महिमा सर्वच संतांनी मुक्त कंठाने गायला आहे. संत नामदेव म्हणतात, 'सर्व प्रकारचे सुकृत प्राप्त करा आणि एक वेळ तरी अलंकापुरी जाऊन या. तिन्ही देव जैसे। परब्रह्मीचे ठसे। जगी सूर्य तैसे। प्रकाशले।।' नाथमहाराज म्हणतात, 'कैवल्याचा पुतळा। प्रकटला भूतळा। चैतन्याचा जिव्हाळा। ज्ञानोबा माझा।। साधकांचा मायबाप। सर्वांभूती सुखरूप।

# इंधन कपातीचा सावळा गोंधळ अन् संदिग्धता थांबावी



## भूमिका



आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे इंधनाचे दर भडकताहेत, असे एकीकडे म्हणायचे आणि दुसरीकडे मात्र दरकपातीचे निर्णय निवडणुका किंवा स्थानिक कारणांनुसार केंद्र-राज्य यांनी बदलते ठेवायचे, असा विरोधाभास गेली काही वर्षे सुरू आहे. बऱ्याच काळानंतर केंद्र सरकारने पेट्रोल-डिझेलच्या उत्पादन शुल्कात घसघशीत कपात केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी महाराष्ट्र सरकारनेही मूल्यवर्धित करात (व्हॅट) कपात केल्याचे वृत्त महाराष्ट्र सरकारकडूनच प्रसृत झाले व वाहनधारक; तसेच पेट्रोल पंपचालकांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली. महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेलचे दर इतर राज्यांच्या तुलनेत चढे असल्याने हा प्रश्न नेहमीच संवेदनशील असतो. बिगर भाजपशासित राज्यांनी इंधनावरील व्हॅट कमी करावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एप्रिलमध्येच केले होते. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह अनेकांनी त्यावर टीकास्त्र सोडल्यामुळे हा प्रश्न राजकीय बनला होता. या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने व्हॅट कमी केल्याची माहिती प्रसृत करताना खबरदारी घेणे आवश्यक होते. राज्य सरकारकडून त्यातील संदिग्धता दूर केली गेली नाही. केंद्राकडून तेल कंपन्यांना आकारल्या जाणाऱ्या किमतीवर राज्यातर्फे व्हॅट हा टक्केवारीने आकारला जातो, तर त्यावरचा उपकर (सेस) हा निश्चित किमतीने आकारला जातो. इंधनाचे दर लीटरमागे कमी झाल्याने, टक्केवारीनुसार राज्य सरकारची व्हॅटची प्राप्ती कमी होणे स्वाभाविक होते; मात्र त्याचा ग्राहकांना स्वतंत्र लाभ पोहोचणार नव्हता. ग्राहकांना अधिक लाभ करून द्यायचा असेल, तर राज्य सरकारने व्हॅटच्या टक्केवारीत कपात करणे गरजेचे आहे व हा निर्णय एका रात्रीत होणार नाही. पेट्रोल-डिझेलचे दर कोणत्या शहरात किती असतील, याची अधिकृत माहिती देणारी एकखांबी यंत्रणाही हवी. वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यापासून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हक्काच्या महसूल प्राप्तीचा, म्हणजे जकातीचा मुख्य स्रोत बंद झाला आहे. भरीस भर म्हणून पुन्हा राजकीय कारणांसाठी महापालिका मालमत्ता करांमध्ये सवलती देऊ लागल्या आहेत. केंद्र सरकारकडून राज्याला जीएसटीपोटी सुमारे २६ हजार कोटी रुपयांचे येणे आहे. सुरुवातीची पाच वर्षे भरपाईची

# 'मुंगेरीलाल के हसीन सपनें'

**पुढच्या वर्षाअखेर तेथील सत्ता शाबूत राहील की नाही, याची शाश्वती नाही. अशा स्थितीत २०२४मध्ये होणारी लोकसभा निवडणूक जिंकण्याची आशा बाळगणे, म्हणजे सोनिया गांधींच्याच भाषेत बोलायचे 'मुंगेरीलाल के हसीन सपनें' ठरणार आहेत.**

आपल्या सहकाऱ्यांविषयी कुढणारे मन आणि बेदिलीच्या मानसिकतेचा इलाज न करताच, राजस्थानातील उदयपूरमध्ये पोहोचलेल्या काँग्रेसजनांनी आत्मचिंतन करण्यालायक आता उरले तरी काय आहे, असा प्रश्न स्वतःलाच विचारायला हवा. गेल्या आठ वर्षांपासून लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमधील सततच्या पराभवांनी या पक्षाला बेचिराख केले आहे. पं. नेहरू-इंदिरा गांधींच्या काळात देशावर सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेसपाशी स्वतःची सत्ता असलेली राजस्थान आणि छत्तीसगड ही दोनच राज्ये उरली आहेत.

पुढच्या वर्षाअखेर तेथील सत्ता शाबूत राहील की नाही, याची शाश्वती नाही. अशा स्थितीत २०२४मध्ये होणारी लोकसभा निवडणूक जिंकण्याची आशा बाळगणे, म्हणजे सोनिया गांधींच्याच भाषेत बोलायचे 'मुंगेरीलाल के हसीन सपनें' ठरणार आहेत. या वर्षाअखेर होणाऱ्या हिमाचल प्रदेश आणि



गुजरात, पुढच्या वर्षी कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडच्या विधानसभा निवडणुकांमध्ये आश्चर्याचा धक्का देणारी विस्मयकारक कामगिरी बजावली, तरच काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत मित्रपक्षांमध्ये गमावलेली पत परत मिळविता येईल. या वास्तवाची जाणीव असली, तरी काँग्रेसजनांची मानसिकता जळूनही पीळ न गेलेल्या सुंभासारखी आहे. काँग्रेस पक्ष सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी-वड्रा आणि हस्तीदंती मनोऱ्यात बसून पक्षावर टीका करणारे असंतुष्ट नेते अशा चार गटांमध्ये विभाजित झाला आहे. पक्षाचे नेमके हित कशात आहे याविषयी त्यांच्यात मतैक्यच होत नाही. कुठल्याही परिस्थितीत विजय मिळवायचाच, या निर्धाराने निवडणुकांमध्ये पूर्ण ताकदीने आणि एकदिलाने भारतीय जनता पक्षाचा सामना करण्याची काँग्रेसमध्ये इच्छाशक्ती उरलेली नाही. पराभव झाला तरी बेहत्तर; पण पक्षांतर्गत प्रतिस्पर्ध्यांचा हिशेब चुकता करणारच, या भावनेने काँग्रेसजन सदैव पेटलेले असतात.

गेल्या २४ महिन्यांत एक डझन राज्यांमध्ये दारुण पराभव होऊनही या मानसिकतेत बदल झालेला नाही. परिणामी तृणमूल काँग्रेस, द्रमुक, माकप, राजद, समाजवादी पक्ष यांसारख्या प्रादेशिक पक्षांनी

## ।। अभंगवाणी ।।



आम्हां आम्ही आतां वडील धाकुटीं ।
नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥१॥
फावला एकांत एकविध भाव । हरि
आम्हांसवें सर्व भोगी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### सलग सात तास झालेल्या बर्फवृष्टीमुळे केदारनाथ यात्रा स्थगित



। उत्तराखंड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उत्तराखंडमध्ये चालू असलेल्या केदारनाथ यात्रेवर आता खराब वातावरणाचा परिणाम पहायला मिळत आहे. या परिसरात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून केदारनाथमध्ये सात तास सलग झालेल्या बर्फवृष्टीमुळे आणि पावसामुळे सोनप्रयागमध्ये चालू असलेल्या यात्रा तूर्तास थांबवण्यात आली आहे. फाटा ते गौरीकुंड पर्यंत चालू असलेली हेलीकॉप्टर सेवा सुद्धा थांबवण्यात आली आहे. दरम्यान पावसाचा जोर वाढला असल्याने प्रशासनाने यात्रा थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. उत्तराखंड सरकारने सोमवारी याबाबत घोषणा केली

### अमलापुरम शहरात बंदला हिंसक वळण

# आंध्र प्रदेशात जिल्ह्याच्या नामकरणावरून वाद!

### जमावानं परिवहन मंत्र्याचे जाळले घर

। हैदराबाद । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आंध्र प्रदेशात नव्याने निर्माण केलेल्या कोनासीमा जिल्ह्याच्या नावाववरून वाद सुरू झाला आहे. जिल्ह्याचे नाव बदलून डॉ. बी.आर.आंबेडकर कोनासीमा जिल्हा करण्याच्या प्रस्तावाविरोधात अमलापुरम शहरात बंद पुकारण्यात आला होता. या बंदला हिंसक वळण लागले. संतप्त जमावाने परिवहन मंत्र्याच्या घरावर हल्ला करुन ते जाळलं. या वेळी पोलिसांची (Police) वाहने आणि बसही पेटवून देण्यात आली. यानंतर अमलापुरममध्ये जमावबंदी लागू करण्यात आली असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

जमावाने केलेल्या हल्ल्यात 20 पोलीस जखमी झाले आहेत. तसेच, पोलिसांच्या लाठीमारात काही आंदोलकही जमखी झाले आहेत. पूर्व गोदावरी जिल्ह्यापासून वेगळे करत 4 एप्रिलला कोनासीमा जिल्ह्याची निर्मिती झाली. मागील आठवड्यात कोनासीमा जिल्ह्याचे नाव बदलून डॉ. बी.आर.आंबेडकर कोनासीमा जिल्हा करण्याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली. यानंतर काही घटकांनी नाव बदलण्यास विरोध केला. कोनासीमा साधना समितीने नाव बदलण्याच्या प्रस्तावाला विरोध करीत जिल्ह्याचे आहे तेच नाव ठेवावे, अशी भूमिका घेतली होती.



सरकारच्या प्रस्तावाविरोधात काल कोनासीमा साधना समितीने 'चलो कोनासीमा'चे आयोजन केले होते. या आंदोलनात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मागील आठवड्यातच जमावबंदीचा आदेश लागू करण्यात आला होता. पोलिसांनी लाठीमार केल्यानंतर जमाव भडकला आणि दगडफेक सुरू केली. यानंतर आंदोलनाला हिंसक वळण लागले. संतप्त जमावाने पोलिसांची गाडी आणि बस जाळली. तसेच परिवहन मंत्री पी. विश्वरुपु यांच्या घरावर हल्ला करत जाळपोळ केली.

कोनासीमाचे पोलीस अधीक्षक के.एस.एस.व्ही. सुब्बा रेड्डी म्हणाले की, या धुमश्चक्रीत पोलिसांसह आंदोलक जखमी झाले आहेत. काल अमलापूरम जिल्हाधिकारी कार्यालयाकडे क्लॉक टॉवरमार्गे मोर्चा निघाला होता. पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु नागरिकांनी पोलिसांच्या दिशेने दगडफेक सुरु केली आणि पोलीस अधीक्षक आणि पोलीस उपअधीक्षक यांच्या वाहनांना लक्ष्य करण्यात आले. जमाव वाढल्याने आणि सगळीकडून दगडफेक सुरू झाल्याने पोलिसांनी माघार घेतली. अखेर सायंकाळी जमावावर नियंत्रण


# कपिल सिब्बल यांनी १६ मे रोजीच काँग्रेस पक्ष सोडला

### कपिल सिब्बल यांचा मोठा निर्णय, सपाच्या पाठिंब्यावर राज्यसभेत जाणार

नवी दिल्ली । महाईन्यूज ।

कपिल सिब्बल यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचा मोठा निर्णय घेतला. त्यांनी समाजवादी पार्टीच्या पाठिंब्यावर राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. मागील अनेक दिवसांपासून काँग्रेसमधील काही ज्येष्ठ नेत्यांनी काँग्रेसच्या पूर्णवेळ अध्यक्षाच्या नियुक्तीपासून पक्षांतर्गत बदलांची मागणी करत वेगळी भूमिका घेतली होती. यात माजी केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल यांचाही समावेश होता. मात्र, आता कपिल सिब्बल यांनी काँग्रेस पक्षातील बदलांचा आग्रह सोडत वेगळा मार्ग चोखाळला आहे. कपिल सिब्बल यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचा मोठा निर्णय घेतला. त्यांनी समाजवादी पार्टीच्या पाठिंब्यावर राज्यसभेसाठी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला आहे. समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यावर राज्यसभा निवडणुकीचा अर्ज भरताना कपिल सिब्बल यांच्यासोबत सपाचे प्रमुख अखिलेश यादव देखील होते. यावेळी सिब्बल यांनी सांगितलं की त्यांनी १६ मे रोजीच काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आहे. सपाकडील आमदारांचं संख्याबळ पाहता कपिल सिब्बल राज्यसभेत निवडून जाणं निश्चित आहे.

कपिल सिब्बल यांनी राज्यसभेसाठी अर्ज भरल्यानंतर अखिलेश यादव म्हणाले, "समाजवादी पक्षाकडून ज्येष्ठ काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांचा राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्यात आला आहे. ते सपाच्या पाठिंब्यावर राज्यसभेत जातील. राज्यसभेसाठी आणखी दोन नावांचीही लवकरच घोषणा होईल."



#### राजीनाम्यानंतर कपिल सिब्बल यांची पहिली प्रतिक्रिया

काँग्रेस पक्षांतर्गत मुद्द्यांवर पक्ष श्रेष्ठींना अडचणीचे प्रश्न विचारणाऱ्या जी-२३ नेत्यांच्या गटातील एक कपिल सिब्बल यांनी अखेर काँग्रेसचा राजीनामा दिला आहे. यानंतर त्यांनी राज्यसभा निवडणुकीसाठी उत्तर प्रदेशातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला आहे. यावेळी समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव व इतर सपा नेतेही हजर होते. त्यांना समाजवादी पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे. यानंतर माध्यमांशी बोलताना कपिल सिब्बल यांनी "मोदी सरकार विरोधात आघाडी करण्याची आमची इच्छा आहे," अशी प्रतिक्रिया दिली.

# सट्टेबाज पोस्टमास्तरने आयपीएल सट्टेबाजीमध्ये २४ कुटुंबांच्या एफडी लावल्या पणाला



। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट सामन्यांवर सट्टा लावलेल्या मध्य प्रदेशातील एका पोस्टमास्टरने एक कोटी रुपये गमवले आहेत. त्याने सट्टेबाजीसाठी तब्बल २४ कुटुंबांची एक कोटी रुपयांची बचत पणाला लावल्याचा आरोप आहे. या कुटुंबांच्या मुदत ठेवीचे पैसे सागर जिल्ह्यातील सब पोस्ट ऑफिसमध्ये जमा करायचे होते. पण पोस्टमास्तरने या पैशांचा सट्टा खेळला. बीना सब पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्टर विशाल अहिरवार यांना बीना रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) २० मे रोजी अटक केली होती.

पोलिसांसमोर त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे सांगण्यात येत आहे. एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, पोलिसांनी सांगितले की, पोस्टमास्तरने बनावट एफडी खात्यांसाठी खरे पासबुक जारी केले आणि मागील दोन वर्षांपासून सर्व पैसे आयपीएल क्रिकेट सट्टयामध्ये गुंतवले. बीना जीआरपी स्टेशन प्रभारी अजय धुर्वे यांनी ही माहिती दिली. ही घटना उघडकीस आल्यानंतर गुंतवणूकदारांचे लाखो रुपये बुडल्याने त्यांची अवस्था बिकट आहे.

"अटक करण्यात आलेल्या सब पोस्टमास्टर विशाल अहिरवारच

## शॉर्ट न्यूज »

### नवाब मलिकांच्या पत्नी आणि दोन मुलांना ईडीचे समन्स



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कुख्यात गुंड दाऊदशी संबंध आणि मनी लॉंड्रिंगच्या आरोपाखाली राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिकांना अटक करण्यात आले आहे. नवाब मलिक यांच्या पत्नी आणि दोन मुलांना चौकशीसाठी ईडीकडून समन्स जारी करण्यात आले होते. परंतु त्यांच्या परिवाराकडून मनमानी करण्यात येत असल्याचा खुलासा ईडीने दाखल केलेल्या चार्जशीटमध्ये केला आहे. ईडीने डी गँगशी संबंधात नवाब मलिकांच्या विरोधात चार्जशीट दाखल केली आहे. मलिकांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणाची चौकशी सुरु आहे. मलिकांच्या पत्नीला आणि दोन मुलांना चौकशीसाठी उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु त्यांनी उपस्थित राहण्यास टाळाटाळ केली असल्याचे ईडीने सांगितले आहे.

### संभाजीराजे यांना शिवसेनेकडून उमेदवारी द्यायला तयार होतो-संजय राऊत

# अखेर संजय पवारांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब !

### संजय राऊतांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

**सहाव्या जागेसाठी लागणारी ४२ मते शिवसेनेकडे होती**

**संजय राऊत आणि संजय पवार लवकरच राज्यसभा निवडणुकीसाठीचा अर्ज भरणार**

मुंबई । महाईन्यूज ।

राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी संभाजीराजे छत्रपती यांना शिवसेनेचा पाठिंबा मिळण्याची शक्यता आता जवळपास मावळली आहे. संजय राऊत यांनी बुधवारी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर संजय राऊत यांनी पुन्हा एकदा संजय पवार हेच शिवसेनेचे सहाव्या जागेवरील उमेदवार असतील, हे स्पष्ट केले. राज्यसभेच्या दोन्ही जागा जिंकण्यासाठी शिवसेनेकडे पुरेशी मतं आहेत. मी आणि संजय पवार लवकरच राज्यसभा निवडणुकीसाठीचा अर्ज भरू. त्यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उपस्थित असतील, असे संजय राऊत यांनी सांगितले. संजय राऊत यांच्या या वक्तव्यामुळे आता संभाजीराजे छत्रपती यांना शिवसेनेकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता आता जवळपास संपुष्टात आली आहे. आम्ही संभाजीराजे यांना शिवसेनेकडून उमेदवारी द्यायला तयार होतो. सहाव्या जागेसाठी लागणारी ४२ मते आमच्याकडे होती. पण आम्ही ही मतं अपक्ष उमेदवाराला कशी देणार, असा सवाल संजय राऊत यांनी विचारला.



### 'छत्रपतींना यापेक्षा अधिक सन्मान काय देणार?'

संजय राऊत यांनी संभाजीराजे छत्रपती यांच्याविषयी शिवसेनेने घेतलेल्या भूमिकेचे पुन्हा एकदा समर्थन केले. आम्ही शिवसेनेच्या कोट्यातील एक जागा संभाजीराजे छत्रपतींना द्यायला तयार झालो. छत्रपती घराण्याचा यापेक्षा अधिक कोणता सन्मान शिवसेनेने करायला पाहिजे होते, हे आता सांगावे. संभाजीराजे यांनी शिवसेनेत प्रवेश करावा ही आमची अट नव्हे तर भूमिका होती. कारण राज्यसभेतील जागा ही शिवसेनेच्या कोट्यातील आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले.

छत्रपतींना राजकीय पक्षाचे वावडे असण्याचे कारण नाही. सिनियर शाहू महाराजांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवली होती. मालोजीराजे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार होते. तर संभाजीराजे स्वत: राष्ट्रवादीकडून लढले होते आणि पराभूतही झाले होते. त्यामुळे छत्रपती घराण्यातील व्यक्ती राजकीय पक्षात जात नाहीत, हा दावा चुकीचा आहे.

### आम्ही ही मतं अपक्ष उमेदवाराला कशी देणार?

राज्यसभेच्या दोन्ही जागा जिंकण्यासाठी शिवसेनेकडे पुरेशी मतं आहेत. त्यामुळे संजय राऊत आणि संजय पवार लवकरच राज्यसभा निवडणुकीसाठीचा अर्ज भरू, अर्ज भरताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे देखील उपस्थित असतील, असं संजय राऊत म्हणाले. आम्ही संभाजीराजे यांना शिवसेनेकडून उमेदवारी देण्यास तयार होतो. सहाव्या जागेसाठी लागणारी ४२ मतं आमच्याकडे होती. पण आम्ही ही मतं अपक्ष उमेदवाराला कशी देणार, असा सवाल देखील संजय राऊतांनी प्रसार माध्यमांशी बोलताना उपस्थित केला.

### छत्रपतींना राजकीय पक्षाचे वावडे असण्याचे कारण नाही

छत्रपतींना राजकीय पक्षाचे वावडे असण्याचे कारण नाही. कारण मालोजीराजे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार होते. तर संभाजीराजे स्वत: राष्ट्रवादीकडून लढले होते आणि पराभूतही झाले होते. त्यामुळे छत्रपती घराण्यातील व्यक्ती राजकीय पक्षात जात नाहीत, हा दावा चुकीचा आहे, असं राऊत म्हणाले. दरम्यान, संजय पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर आता संभाजीराजे छत्रपती काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. संभाजीराजे आता मराठा संघटनांशी चर्चा करून पुढील रणनीती निश्चित करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मुंबईकरांनो आता बाईकच्या मागे बसतानाही हेल्मेट घाला, नाही तर होईल दंड

### मुंबई पोलिसांनी दिली या संदर्भात ट्विटरवर माहिती

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

टीव्हीत किंवा चित्रपटात आपण बाईकस्वार आणि त्या मागील व्यक्तीने हेल्मेट घातल्याचे पाहत असतो. शिखर धवनच्या एका जाहिरातीतही आपण तसे पाहिले आहे. पण आता ते प्रत्यक्षात होणार आहे. बाईकवर बसणाऱ्या प्रत्येकाला हेल्मेट सक्तीचे आहे. तो बाईक चालवत असेल किंवा बाईकच्या मागील सीटवर बसलेला असेल. मुंबई पोलिसांना या संदर्भात ट्विटरवर माहिती दिली आहे. आता बाईक किंवा स्कूटर रस्त्यावर काढताना हेल्मेट घरी विसरणे किंवा हेल्मेट घालण्याचा कंटाळा करणं महागात पडणार आहे. हे चालवणाऱ्यालाच नव्हे तर बाईकवर मागे बसणाऱ्या व्यक्तिसाठी आहे. आता बाईक किंवा स्कूटीवर बसणाऱ्या दोघांनाही हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे.



मुंबई शहरामध्ये अनेक मोटार सायकलस्वार हे हेल्मेटविना बाईक चालवतात. यामध्ये बाईक चालवणाऱ्याच्या मागे बसलेली व्यक्ती हे हेल्मेटचा वापर करीत नाहीत. मात्र आता असं केल्यास मागच्या व्यक्तीची पावती फाडली जाणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, येत्या 15 दिवसांमध्ये हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी होणार आहे. यानुसार बाईक चालवणाऱ्याला आणि मागे बसणाऱ्या अशा दोन्ही व्यक्तींना हेल्मेट घालणं बंधनकारक असणार आहे. यामध्ये विनाहेल्मेट बाईक किंवा स्कुटी चालवण्यास पाचशे रूपये दंड किंवा 3 महिने लायसन्स रद्द होऊ

### 15 दिवसांमध्ये आदेशाची अंमलबजावली

मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी यासंदर्भात आदेश काढला असून येत्या 15 दिवसांमध्ये त्याची अंमलबजावली केली जाण्याची शक्यता आहे. आता 15 दिवसांनंतर स्कुटी, बाईकने बाहेर जाणार असाल तर हेल्मेट घेतल्याची खात्री करा.

# राणा दाम्पत्याला दिलासा; खार येथील घरावर पुढील आदेशापर्यंत महापालिकेला कारवाई न करण्याचे आदेश

। अमरावती । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि त्यांचे पती आमदार रवी राणा यांना दिंडोशी कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने राणा दाम्पत्याला खार येथील घरासंदर्भात अर्ज करण्यासाठी 1 महिन्याची मुदत दिली आहे. तसेच पुढील आदेशापर्यंत कारवाई न करण्याच्या सुचनाही न्यायालयाने मुंबई महापालिकेला दिल्या आहेत.



नवनीत राणा आणि रवी राणा यांच्या खार येथील घराचं अनधिकृत बांधकाम पाडण्याचे आदेश मुंबई महानगरपालिकेने दिले होते. यानंतर दोघांनी न्यायालयाने धाव घेतली. दरम्यान आज न्यायालयाने राणा दाम्पत्याला एक महिन्यांची मुदत दिली आहे. पालिकेला पुढील आदेशापर्यंत कारवाई न करण्याचे आदेश दिले.

### नेमकं प्रकरण काय आहे?

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्या मुंबईतील खार येथील घराचे बांधकाम अनधिकृत असल्याच्या अनेक तक्रारी मुंबई मनपाकडे आल्या होत्या. यावेळी इमारतीतील अनेक सदनिका मंजूर आराखड्याच्या व्यतिरिक्त अधिकचे बांधकाम करत पालिकेच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला.

# तुला चित्रपटात कोण काम का देत नाही? उर्फीनं दिलं भन्नाट उत्तर



फॅशन आणि हटके स्टाइलच्या नावाखाली अतरंगी कपडे घालणाऱ्या उर्फी जावेदची सोशल मीडियावर चर्चा सुरू असते. उर्फीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरलही होतात. पण तिला नेटकरी ट्रोल देखील तितकंच करतात. उर्फी रोज नवीन स्टाइल आणि हटके कपड्यांमध्ये घरातून बाहेर पडते. असल्या हटके आणि अनेकदा अंगप्रदर्शन करणाऱ्या कपड्यांमुळं ती चर्चेचा विषय ठरते. उर्फी चर्चेत असली तरी तिला मालिका किंवा चित्रपटांच्या ऑफर्स काही येत नाहीत. चर्चेत राहण्यासाठी किंवा लोकांना आकर्षित करण्यासाठी तू हे असल्या अतरंगी अवतारात दिसेस? या प्रश्नावर उर्फीनं बोल्ड असं उत्तर दिलं. जे लोक म्हणतात, त्यांना चर्चेत राहायचं नाही, लोकांचं अटेन्शन नकोय, ते नक्कीच खोटं बोलत आहेत. अटेन्शन कोणाला नकोय? मला हे हवंय, त्यामुळं मला जे आवडतंय, योग्य वाटतंय ते मी का करू नये, मला चित्रपट किंवा मालिका मिळत नाहीयेत. मी जे करतेय ते चांगलं नाहीए का? असे अनेक प्रश्न करत उर्फीनं उत्तर दिलं. चित्रपटांच्या ऑफर्स का येत नाहीत? यावर उर्फी म्हणाली की, बॉलिवूड काय माझ्या बापाचं नाहीए... मला लवकर चित्रपट मिळावे, असं वाटत असेल तर ते चुकीचं आहे.

# 29 मे रोजी होणार ‘लाल सिंह चड्ढा’ चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च



बॉलिवूडचा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित चित्रपट ‘लाल सिंह चड्ढा’ची प्रेक्षक गेल्या अनेक दिवसांपासून वाट पाहत आहेत. या चित्रपटात अभिनेता आमिर खान आणि अभिनेत्री करीना कपूर मुख्य भूमिकेत दिसून येणार आहेत. आता या चित्रपटाच्या ट्रेलरबाबत एक माहिती समोर येत असून सूत्रांच्या मते ‘लाल सिंह चड्ढा’चा ट्रेलर आईपीएलच्या समापन समारंभा दरम्यान लॉन्च करण्यात येणार आहे. एक व्हिडिओ शेअर करत आमिर खानने त्याच्या प्रोडक्शन हाऊसच्या इंस्टग्राम अकाउंटवर ही माहिती दिली आहे.

या व्हिडिओमध्ये आमिर खानला एक व्यक्तीने ‘लाल सिंह चड्ढा’ चित्रपटाचे ट्रेलर कधी दाखवणार याबाबत विचारले. तेव्हा आमिर खान म्हणाला की, २९ मे रोजी आईपीएलच्या शेवटच्या मॅच दरम्यान पहिल्या इनिंगच्या दुसऱ्या टाइम आऊट वेळी चित्रपटाचे ट्रेलर लॉन्च करण्यात येईल. प्रोडक्शन हाऊसने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर लिहिलंय की, ‘लाल सिंह चड्ढा’ चित्रपटाचे ट्रेलर २९ मे रोजी टी२० क्रिकेट फाइनल मॅचमध्ये पहिल्या इनिंगच्या दुसऱ्या वेळी आऊट केले जाईल. दिग्दर्शक अद्वैत चंदन यांच्या ‘लाल सिंह चड्ढा’मध्ये आमिर खान मुख्य भूमिका साकारणार असून अभिनेत्री करीना कपूर त्याच्या प्रेमिकेच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय ‘लाल सिंह चड्ढा’मध्ये साउथ अभिनेता नागा चैतन्य आणि मोना सिंह सुद्धा महत्त्वाची भूमिका साकारताना दिसून येणार आहेत.

**‘लाल सिंह चड्ढा’ चित्रपटाची गोष्ट**

हा चित्रपट १९९४ मध्ये आलेला अमेरिकन चित्रपट ‘फॉरेस्ट गम्प’चा रिमेक असून खरंतर हा चित्रपट १४ एप्रिल रोजी रिलीज होणार होता मात्र नंतर त्याची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. आता हा चित्रपट ११ ऑगस्ट २०२२ रोजी रिलीज होणार आहे.

# ‘धर्मवीर’ची 10 दिवसांत तब्बल 18.03 कोटींची कमाई



दिग्दर्शक प्रवीण तरडे आणि मंगेश देसाई यांची निर्मिती असलेला ‘धर्मवीर मुक्काम पोष्ट ठाणे’ (DHARMAVEER MUKKAM POST THANE) हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर (BOX OFFICE) धुमाकूळ घालताना दिसत आहे. या चित्रपटाची मागील दहा दिवसांची बॉक्स ऑफिसवरील कमाई समोर आली आहे. धर्मवीर चित्रपटाने 10 दिवसांत तब्बल 18.03 कोटींची कमाई केली आहे.

13 मे रोजी धर्मवीर प्रदर्शित झाला असून, प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्रातील सर्व सिनेमागृहात हाऊसफूलचा बोर्ड लागला होता. ठाण्यात शिवसेनेचं स्थान बळकट करणारे, कट्टर शिवसैनिक म्हणून ओळख निर्माण करणारे दिवंगत नेते धर्मवीर आनंद दिघे (ANAND DIGHE) यांचा जीवनप्रवास या चित्रपटात दाखवण्यात आला आहे.

‘धर्मवीर मुक्काम पोष्ट ठाणे’ या चित्रपटात अभिनेता प्रसाद ओकने (PRASAD OAK) आनंद दिघे यांची भुमिका साकरली आहे. या भुमिकेसाठी बोलण्याची शैली, देहबोली तसेच काही विशिष्ट पद्धतीने अभ्यास केल्याचे प्रसाद ओकने सांगितले. हा चित्रपट पाहताच आनंद दिघे साहेब परत आल्याची भावना सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण झाली आहे.

दरम्यान, ‘धर्मवीर मुक्काम पोष्ट ठाणे’ हा चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर यशस्वी झाला होता. पहिल्याच आठवड्यात 13.87 कोटींची कमाई केली होती.

# ‘जुग जुग जियो’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा

कोरोना महामारीनंतर, संपूर्ण भारतातील चित्रपटगृह मोठ्या पडद्यावर परतणाऱ्या चित्रपटांचा आनंद घेत आहेत. नेक्सस मॉल्स हे त्याच्या जागतिक दर्जाच्या खरेदी, मनोरंजन आणि उत्तम खाद्यपदार्थांच्या अनुभवांसाठी ओळखले जातात, नुकतेच ‘जुग जुग जियो’चे ट्रेलर लॉन्च झाले असून अभिनेता वरुण धवन, अनिल कपूर, अभिनेत्री कियारा अडवाणी आणि नीतू सिंग यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. ‘जुगजुग जीयो’ या चित्रपटाचे पहिले पोस्टर रिलीज झाले असून सोशल मीडियावर त्याची खळबळ उडाली. ‘जुगजुग जीयो’च्या टीमने त्यांच्या आगामी चित्रपटाच्या प्रमोशनला सुरुवात केली असून चाहत्यांनी त्यांच्या संपुर्ण टिमला शुभेच्छाही दिल्या. संपूर्ण टीम आणि इंडस्ट्रीतील नामवंत कलाकारांना भेटण्यासाठी चाहते उत्सुक होते.

‘जुगजुग जीयो’ हा राज मेहता दिग्दर्शित आणि यश जोहर आणि अपूर्व मेहता निर्मित एक भारतीय विनोदी-नाटक चित्रपट आहे. धर्मा प्रॉडक्शनचा बहुप्रतिक्षित चित्रपट मल्टिप्लेक्समध्ये पिरेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज आहे. कारण व्यवसाय पुन्हा पूर्वपदावर येत आहे आणि लोकांना पुन्हा चित्रपटगृहांमध्ये बॉलीवूडची जादू अनुभवायची आहे. हे ॲमेझोन प्राईम सह ओटीटी प्लॅटफॉर्मवर देखील उपलब्ध आहे. हा चित्रपट 24 जून 2022 रोजी संपूर्ण भारतात प्रदर्शित होत आहे.



# ‘भूलभुलैया 2’ चा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ



सूत्रांच्या मते ‘भूलभूलैया 2' चित्रपटाने शुक्रवारी 14.11 करोड, शनिवारी 18.34 करोड, रविवारी 23.51 करोड, सोमवारी 10.75 करोड मंगळवारी 9.56 करोडच्या कलेक्शन सह ७६.२७ करोड कमावले आहेत. ‘भूलभूलैया 2’ चित्रपटाचा यावर्षीच्या सुपरहिट चित्रपटांच्या यादीत सहभाग झाला आहे. 2022 मध्ये मंगळवारच्या सर्वाधिक कमाईमध्ये ‘भूलभूलैया 2’ तिसऱ्या क्रमांकावर आहे. यापूर्वी ‘द कश्मीर फाइल्स’ चित्रपटाने प्रदर्शनाच्या पाचव्या दिवशी 18 करोडची कमाई केली होती. तर ‘गंगूबाई काठियावाडी’ने 10.01 करोडची कमाई केली होती. ‘भूलभूलैया 2’ या यादीत तिसऱ्या क्रमांकावर असून ‘भूलभूलैया 2’ने पाचव्या दिवशी 9.56 करोडची कमाई केली आहे. कार्तिक आर्यनच्या करिअर मधील ‘भूलभूलैया 2’ हा सर्वाधिक सुपरहिट चित्रपट सिद्ध होत आहे. ‘भूलभूलैया 2’ चित्रपटाचे दिग्दर्शन अनीज बज्मी यांनी केले असून चित्रपटात कार्तिक आर्यन सोबत तब्बू, कियारा अडवाणी सुद्धा मुख्य भूमिकेत दिसून येत आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### अफगाणिस्तानच्या गोलंदाजांना मिळणार नवे गुरुजी

**नवी दिल्ली । महाईन्यूज**

अफगाणिस्तान क्रिकेट संघाकडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील उगवता तारा म्हणून बघितले आहे. या संघाने विविध संकटांवर मात करून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. तालिबानच्या संकटाचा सामना करत या संघाने मोठ्या धीराने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. राशीद खान, मोहम्मद नाबी आणि मुजीब उर रहमान यासारख्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळवली आहे. अफगाणिस्तानमध्ये आतापर्यंत अनेक चांगले फिरकीपटू तयार झाले आहेत. परंतु, त्यांच्याकडे पाहिजे तेवढे चांगले वेगवान गोलंदाज नाहीत.

अफगाणिस्तान क्रिकेटसाठी हा चिंतेचा विषय आहे. आता ही चिंता दूर होण्याची शक्यता आहे. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने एका दिग्गज माजी खेळाडूची गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती आहे. अफगाणिस्तानने अलीकडेच इंग्लंडचे माजी फलंदाज ग्रॅहम थॉर्प यांची पुरुष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या साथीला आता पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज उमर गुलची नियुक्ती करण्यात आली आहे.

## चेसेबल मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा :

# प्रज्ञानंदची अंतिम फेरीत धडक!

### जागतिक क्रमवारीत 10व्या स्थानावरील गिरीला पराभवाचा धक्का

**। चेन्नई । महाईन्यूज ।**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने चेसेबल मास्टर्स ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय बुद्धिबळपटू ठरला आहे. प्रज्ञानंदने मोक्याच्या क्षणी आपला खेळ उंचावत उपांत्य फेरीत हॉलंडच्या अनिश गिरीला ३.५-२.५ असा पराभवाचा धक्का दिला. उपांत्य फेरीत चार डावांअंती दोन्ही खेळाडूंमध्ये २-२ अशी बरोबरी होती. मग बरोबरीची कोंडी सोडवण्यासाठी झालेल्या टायब्रेकरमध्ये प्रज्ञानंदने बाजी मारत अंतिम फेरीतील स्थान सुनिश्चित केले. या फेरीत त्याच्यापुढे जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानी असलेल्या चीनच्या डिंग लिरेनचे आव्हान असेल. लिरेनने उपांत्य फेरीत धक्कादायक निकालाची नोंद करताना पाच वेळा जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनवर २.५-१.५ अशी मात केली.

बुधवारी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात १६ वर्षीय प्रज्ञानंदविरुद्ध जागतिक क्रमवारीत दहाव्या स्थानी असलेल्या गिरीचे पारडे जड मानले जात होते. परंतु, पहिल्या डावापासून प्रज्ञानंदने गिरीला उत्तम झुंज दिली. पहिला डाव बरोबरीत सुटल्यानंतर प्रज्ञानंदने दुसऱ्या डावात विजयाची नोंद केली. तिसऱ्या डावात सुरुवातीच्या चालींमध्ये गिरीने वर्चस्व गाजवले. मात्र, प्रज्ञानंदने दमदार पुनरागमन करताना हा डाव बरोबरीत सोडवला आणि एकूण लढतीत २-१ अशी आघाडी मिळवली. परंतु, गिरीने आपला अनुभव पणाला लावताना चौथा डाव जिंकल्याने लढतीत २-२ अशी बरोबरी झाली.



### सामन्यानंतर काही तासांतच 11वीची परीक्षा!

प्रज्ञानंदचा गिरीविरुद्धचा उपांत्य फेरीतील सामना रात्री उशिरापर्यंत चालला. त्यानंतर काही तासांतच त्याला इयत्ता ११वीची परीक्षा देण्यासाठी हजर राहावे लागले. “मला सकाळी ८.४५ वाजेपर्यंत महाविद्यालयात पोहोचायचे आहे आणि आता रात्रीचे २ वाजले आहेत,” असे सामन्यानंतर प्रज्ञानंदने सांगितले. तसेच परीक्षा दिल्यानंतर साधारण १२ तासांनी तो लिरेनविरुद्ध अंतिम सामना खेळेल. “माझी वाणिज्य शाखेची परीक्षा आहे. मी या परिक्षेत उत्तीर्ण होईन अशी आशा आहे. परीक्षा चांगली गेली आणि अंतिम सामन्यात विजयही मिळवण्यात यश आले, तर मला आणखी काय हवे? मात्र, परिक्षेत उत्तीर्ण होण्यापेक्षा सामना जिंकण्याचा आनंद अधिक असेल,” असेही प्रज्ञानंद हसतमुखाने म्हणाला.

## फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा :

# त्सित्सिपासचा निसटता विजय!

### ◆ जोकोव्हिच, झ्वेरेव्ह, सबालेंका, अझरेंकाचीही आगेकूच; रॅडूकानू पराभूत

**। एपी, पॅरिस। महाईन्यूज ।**

गतउपविजेत्या ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या पहिल्या फेरीत निसटत्या विजयाची नोंद केली. तसेच गतविजेता नोव्हाक जोकोव्हिच आणि तिसऱ्या मानांकित अ‍ॅलेक्झांडर झ्वेरेव्ह यांनी आपापल्या दुसऱ्या फेरीतील लढतीत विजय मिळवले. महिला एकेरीत अरिना सबालेंका, व्हिक्टोरिया अझरेंका यांना आगेकूच करण्यात यश आले. अमेरिकन खुल्या स्पर्धेतील गतविजेत्या एमा रॅडूकानूचे आव्हान मात्र संपुष्टात आले.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीतील चुरशीच्या लढतीत चौथ्या मानांकित त्सित्सिपासने इटलीच्या लोरेंझो मुसेट्टीला ५-७, ४-६, ६-२, ६-३, ६-२ असे पराभूत केले. हा सामना तीन तास ३४ मिनिटे चालला. पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत अग्रमानांकित सर्बियाच्या जोकोव्हिचने स्लोव्हाकियाच्या अ‍ॅलेक्स मोलकानवर ६-२, ६-३, ७-६ (७-४) असा विजय



मिळवला. सामन्यातील पहिले दोन सेट जोकोव्हिचने सहज जिंकले. मात्र, तिसऱ्या सेटमध्ये मोलकानने त्याला आव्हान दिले. गेल्या पर्वात उपांत्य फेरी गाठणाऱ्या झ्वेरेव्हने पिछाडीवरुन मुसंडी मारत तब्बल ३ तास ३६ मिनिटे चाललेल्या लढतीत अर्जेंटिनाच्या सेबॅस्टियन बाएजला २-६, ४-६, ६-१, ६-२, ७-५ असे पराभूत करत पुढची फेरी गाठली. तसेच कॅनडाच्या नवव्या मानांकित फेलिक्स ऑगर-ॲलिसिमेने अर्जेंटिनाच्या कॅमिलो उगो काराबेलीला ६-०, ६-३, ६-४ असे नमवले. महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत दोन वेळा ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेची विजेती आणि १५व्या मानांकित अझरेंकाने जर्मनीच्या आंद्रेया पेट्कोव्हिचला ६-१, ७-६ (७-३) असे सरळ सेटमध्ये नमवत आगेकूच केली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही

# निसर्गाच्या कुशीत वसलेल तुमचं परिपूर्ण घर !
## मोशी येथील भव्यदिव्य टाऊनशिप

अक्षयतृतियेच्या गोरज मुहूर्तावर संधीच सोनं करा...



**तुमचा फ्लॅट आजच बुक करा !**

### Silver Gardenia
3.5 BHK | 3 BHK | 2.5 BHK | 2 BHK | 1 BHK



Gat No. 153, Opp. D Mart, Borhadewadi, Moshi, Pune - 412105.

8888889379 | 8888886421 | 9090907271

Rera No. - P52100034553

### SILVER SAKSHI
Commercial Shop | 3 BHK | 2 BHK | 1 BHK



Dehu-Alandi BRT Road, Near D-Mart, Borhadewadi, Moshi, Pune - 412105.

62627 11717 | 84464 74861

Rera No. - P52100030478

SILVER GROUP